REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

ISSN: 2277-8721)

Impact factor (IIFS): 0.987

Bi-Monthly

VOL - III | ISSUES - V | Sep -Oct | [2014]

Chief-Editor:

Ubale Amol Baban

[ **Editorial/Head Office**: 108, Gokuldham Society, Dr.Ambedkar chowk, Near TV Towar,Badlapur, MS ,

**Contact Off : 09822307164**

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ) ISSN
Bi-monthly A Reviewed Journal Sep/Oct 2014 2277-8721

# रोजगार विनिमय केंद्रातील नोंदणीकृत बेरोजगार उमेदवारांचे अध्ययन – संदर्भ अकोला जिल्हा

**डॉ. नितिन ज्ञानदेव चौधरी**
**एम. ए. अर्थशास्त्र, एम. फिल, पीएच. डी.**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यपीठ, अमरावती

**प्रस्तावना**

प्रत्येक देशाला आज बेरोजगारीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. मग ती बेरोजगारी व्यवसायाच्या भरभराटीमुळे निर्माण झालेली असो किंवा अनियीमत येणाऱ्या मंदितील असो. भारतात या समस्येची तीव्रता फार जास्त आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारत हा एक विकसनशील देश असून निवडक क्षेत्रातच देशाचा विकास झाला आहे. त्यामुळे भारतात रोजगाराच्या संधी फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे भारत हा अतिलोकसंख्येचा देश आहे त्यामुळे येथे काम शोधणाऱ्या लोकांची संख्या फार जास्त आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात बेरोजगारी व्यापक प्रमाणात आढळून येते. परंतु आकडेवारीच्या अभावामुळे योग्यरित्या बेरोजगारीचे मापन करणे शक्य होत नाही. भारतात बेरोजगारीची नोंद घेणारी एक महत्ववाची संस्था म्हणून रोजगार विनिमय केंद्राचा उल्लेख करता येतो. भारतात मनुष्यबळ व नियोजन विकासाच्या दृष्टीने सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामध्ये असलेले उद्योगव्यवसाय, कार्यालये किती आहेत? तसेच त्यांच्यात किती मनुष्यबळ कार्यरत आहे? व किती रिक्त पदे आहेत? ही अद्यावत माहिती संकलित करणे आवश्यक आहे. ही माहिती संकलित करणे सुलभ व्हावे म्हणून केंद्रशासनाने सेवायोजन कार्यालय (रिक्तपद अधिसूचीत करणारा) कायदा –1959 तयार केला या कायद्याची अंमलबजावणी देशातील प्रत्येक जिल्ह्यात सेवायोजन कार्यालया मार्फत केली जाते.

**संशोधनाचा उद्देश व व्याप्ती :**

जगतिक आर्थिक मंदिच्या लाटेत अनेकांच्या नोकऱ्यांवर गदा येवू लागली आहे. रोजगाराच्या शोधात असणाऱ्या लाखो बेरोजगारांवरील बेकारीचे सावट गडद झाले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणारा कामगार या घटकाचे अध्ययन करून त्यांना रोजगार विनिमय केंद्राची भूमिका कितपत यशस्वी ठरली आहे याचे अध्ययन करण्यासाठी संशोधकाने रोजगार विनिमय केंद्रातील नोंदणीकृत बेरोजेगार उमेदवारांचे विश्लेषणात्मक अध्ययन हा विषय अध्ययनासाठी निवडला आहे.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून रोजगार विनिमय केंद्र अस्तित्वात आहे. परंतु 1956 च्या Employment Exchange CNV (Compulsory Notification of Vacancies) ACT नुसार भारतातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा सेवायोजन कार्यालयाची स्थापना करण्यात आली. सध्या भारतात आर्थिक सर्वे 2013.14 नुसार 969 रोजगार विनिमय केंद्रे आहेत. महाराष्ट्रात 35 जिल्ह्यात 54 रोजगार विनिमय केंद्रे असून महाराष्ट्रातील 18,18,617 लोकसंख्या असणाऱ्या तसेच 7 तालुक्यांचा अकोला जिल्हा अध्ययनाकरिता निवडला आहे. तसेच अध्ययनाकरिता 2002 ते 2007 हा कालावधी निवडण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण :**

भारतात रोजगार विनिमय केंद्रात अध्ययन कालावधीत नोदणीकृत बेरोजगार उमेदवावरांचे विश्लेषण खालील सारणीद्वारे करता येते.

सारणी क्रमांक 1

अध्ययन कालावधीतील नोंदणीकृत बेरोजगारांचे विश्लेषण

| वर्ष | नोंदणीकृत बेरोजगार | | |
|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | अकोला |
| 2002–03 | 4,11,71,200 (–) | 42,03,271 (–) | 96,831 (–) |
| 2003–04 | 4,13,88,700 (0.53) | 40,44,132 (–3.79) | 85,217 (–11.19) |
| 2004–05 | 4,04,57,700 (–2.25) | 41,05,740 (1.52) | 90,412 (6.07) |
| 2005–06 | 3,93,47,800 (–2.74) | 40,00,280 (–2.57) | 87,687 (–3.01) |
| 2006–07 | 4,14,66,000 (5.38) | 36,08,459 (–9.79) | 84,058 (–4.14) |

स्त्रोत : भारत 2011 व रोजगार व स्वयंरोजगार विभाग कार्यक्रम अंदाजपत्रक

(कंसातील आकडे वृध्दीदर दर्शवितात)

प्रस्तुत सारणी वरून असे निदर्शनास येते की, भारतात 2006–07 मध्ये मोठ्याप्रमाणात बेरोजगारीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. तर महाराष्ट्रात त्यामानाने बेरोजगारीत सातत्याने घट झाल्याचे दिसून येते व अकोला जिल्ह्यात सुध्दा बेरोजगारीत घट झाल्याचे दिसून येते.

रोजगार विनिमय केंद्रामार्फत रोजगार संधी निर्माण करण्याकरिता विविध कार्यक्रम राबविले जातात. यामार्फत रोजगार प्राप्त नोंदणीकृत उमेदवारांचे विश्लेषण खालील सारणीत केले आहे.

सारणी क्रमांक 2

अध्ययन कालावधीतील नोंदणीकृत रोजगार प्राप्त उमेदवारांचे विश्लेषण

| वर्ष | नोंदणीकृत रोजगारप्राप्त उमेदवार | | |
|---|---|---|---|
| | भारत | महाराश्ट्र | अकोला |
| 2002–03 | 1,77,700 (–) | 9,542 (–) | 91 (–) |
| 2003–04 | 1,42,600 (–19.75) | 16,419 (72.07) | 128 (40.66) |
| 2004–05 | 1,54,900 (8.63) | 15,120 (–7.91) | 91 (–28.91) |
| 2005–06 | 1,37,600 (–11.17) | 13,936 (–7.83) | 21 (–76.92) |
| 2006–07 | 1,73,200 (25.87) | 14,771 (5.99) | 105 (400) |

स्त्रोत : भारत 2011 व रोजगार व स्वयंरोजगार विभाग कार्यक्रम अंदाजपत्रक
(कंसातील आकडे वृध्दीदर दर्शवितात)

वरील सारणी वरून असे लक्षात येते की, भारतात निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधीमध्ये सातत्य असलेले दिसून येत नाही. तर महाराष्ट्रात मात्र 2003–04 नंतर रोजगार प्राप्त उमेदवारांमध्ये मोठ्याप्रमाणात बदल होतांना दिसून येत नाहीत. तर अकोला जिल्ह्यात मात्र रोजगार प्राप्त उमेदवारांची संख्या फारच कमी असल्याचे दिसून येते. कारण सारणी एक मधील अकोला जिल्ह्यातील नोंदणीकृत बेरोजगार व सारणी 2 मधील नोकरी प्राप्त उमेदवार बघता यात खुप तफावत असलेली दिसून येते.

**रोजगार विनिमय केंद्राच्या समस्या :**

भारतात रोजगार विनिमय केंद्र हे देशातील प्रत्येक जिल्ह्यात आहे. देशातील गंभीर समस्या असणाऱ्या बेरोजगारी दुर करण्यात या केंद्राची भूमिका महत्ववपूर्ण आहे. परंतु या केंद्राल अपुरा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असल्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

1. बेरोजगार उमेदवारांना नोकरीचे कॉल वेळेवर प्राप्त होत नाहीत.
2. शासनाच्या विविध योजनांची वेळेवर अंमलबजावणी करणे शक्य होत नाही.
3. शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी उद्योजकांना त्यांच्याकडील रिक्तपदांची नोंदणी रोजगार विनिमय केंद्रात करणे सक्तीचे असल्यानंतरही अशाप्रकारची नोंदणीची अंमलबजावणी त्यांच्यामार्फत होत नाही.
4. भारतात जरी शहरीकरण मोठ्या प्रामणात होत असले तरी ग्रामीण जनतेपर्यंत हे रोजगार विनिमय केंद्र पोहचू शकले नाही.

भारतासारख्या विकसनशील देशात श्रमिकांची गतिशीलता कमी असल्यामुळे त्यांना रोजगार संधी मिळवून देण्यात या केंद्रांना अपयश येत आहे. नोकरीच्या संधी प्राप्त करून देण्यासाठी पाठविण्यात येणारे मुलाखत पत्र हे मुलाखत झाल्यानंतर उमेदवारास प्राप्त होतात. सध्या रोजगार मिळविण्याकरिता मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असून यामुळे या केंद्राचे महत्ट्टव कमी होत आहे. नोंदणीकृत बेरोजगार उमेदवारांना रोजगार प्राप्त झाल्यानंतरही त्याचे नाव बेरोजगारंच्या आकडेवारी मध्ये समावेशीत असते. त्यामुळे वास्तविक बेरोजगारीची आकडेवारी प्राप्त करणे कठीण जाते.

**रोजगार विनिमय केंद्रातील अडचणी दुर करण्यासाठी उपाययोजना :**

1. बेरोजगारी कमी करणाऱ्या रोजगाार विनिमय केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची समस्या शासनामार्फत त्वरीत सोडविण्यात यावी.
2. रोजगार विनिमय केंद्रात अधिसूचीत रिक्त पदांची माहिती ठळक स्वरूपात दृष्यफलकावर लावण्यात यावी.
3. नोंदणीकृत बेरोजगार उमेदवारांना रोजगारीसाठी मुलाखत पत्र पाठवितांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा.
4. शासनातर्फे खाजगी, शासकीय व निमशासकीय स्तरावर निर्माण होणाऱ्या रिक्तपदांकरिता काही प्रमाणात जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील नोंदणीकृत उमेदवारांनाच नोकरीवर घेण्यात येईल अशी बंधने लादणे योग्य ठरेल. जेणे करून केंद्र अधिक प्रभावी पणे काम करू शकेल.
5. बेरोजगार उमेदवारांना रोजगार प्राप्त करण्याकरिता रोजगार विनिमय केंद्रात नोंदणी करणे सक्तीचे करण्यात यावे.

**निष्कर्श :**

प्रस्तुत संशोधनावरून असे दिसून येते की, रोजगार विनिमय केंद्र हे काम मागणारे बेरोजगार व काम देणारे उद्योजक यांच्यामधील दुवा आहे. जर या कार्यालयाच्या कार्यची यशस्वीरित्या अंमलबजावणी झाली तर निश्चितच देशातील बेरोजगारी कमी झाल्या शिवाय राहणार नाही. भारतासारख्या अतिलोकसंख्येच्या देशात मानवी संसाधनांची योग्य नियोजन होण्याची अत्यंत गरज आहे. त्यासाठी हाताला काम आणि कामाला हात यांची योग्य सांगड घालण्याची आवश्यकता आहे. हे काम रोजगार विनिमय केंद्रच यशस्वीरित्या पार पाडू शकते.

**संदर्भ सूची :**

आंबेडकर ना. शं., पाटील ज. फा. : 1979 : भारतीय कामगार समस्या व कामगार विधान : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे–30.

मेघे ज्ञानेश्वर : 1975 : श्रम समस्या आणि औद्योगिक संबंध : पडगीलवार प्रकाशन, नागपूर–2.

Kaufman Bruce E. & Hotchkiss Julie L. - The Economic of Labour Markets - Published by : Thomson, South western , Canada, 6th edition.

Mathew E.T. 1997- Employment & Unemployment in Kerala (Some Neglected Aspects), Sage Publication, New Delhi –

Mishra L. 2001- Economy & Labour - Manak Publication New Delhi,

Annual Report 2009-2010 to The People on Employment, Government of India, Ministry of Labour & Employment.

A Report On, Employment & Unemployment, 64th Round of National Sample Survey, Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai, July, 2007 - June, 2008